सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१७ -२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल**

## आठवा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक फेब्रुवारी, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
फेब्रुवारी, २०१९

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

**(२०१७ -२०१८)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल**

**आठवा अहवाल**

एचबी २४२८–१

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स

(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.).

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

**अनुसूचित जमाती कल्याण समिती**

**(२०१५-२०१६)**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.

(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.

(९) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

* (१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.

(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स

(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव.

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

* (१) मा. सभापती यांनी श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आल्याने दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची पुन्हा समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| | **प्रस्तावना** | . . | (सात) |
| (१) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी व जिल्हा परिषद, रत्नागिरी | . . | १ |
| (२) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग व जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग | . . | २० |
| (३) | बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त (परिशिष्ट-१) | . . | ३३ |

**प्रस्तावना**

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा आठवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ते ९ जून, २०१७ या कालावधीत रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे भेट देऊन बैठका घेण्यात आल्या होत्या. उक्त बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रातंर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणाऱ्या प्रकल्पांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यासंदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवनः**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९.

**प्रा. डॉ. अशोक उईके,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

किंमत रुपये १२५

## अहवाल

### जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ते ९ जून, २०१७ या कालावधीत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दौरा आयोजित केला होता. सदर दौऱ्यात समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे दिनांक ७ जून, २०१७ रोजी भेट दिली होती. सदर भेटीच्या वेळी समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :—**

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग-३ सरळसेवेसाठी आरक्षित असलेल्या पदांमध्ये तलाठी या वर्गातील एक पद रिक्त असून सदर पद रिक्त असण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, तलाठी संवर्गामध्ये २८ पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव असून २७ पदे भरण्यात आली आहेत. १ पद रिक्त असून ते अनुसूचित जमाती (माजी सैनिक) या प्रवर्गासाठी राखीव आहे. माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये भरती प्रक्रिया झाली होती. परंतु, निवड यादीमध्ये समाविष्ट होण्यासाठी आवश्यक असणारे गुण प्राप्त करणारा एकही उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे सदरचे पद रिक्त राहिले आहे. त्यावर समितीने, उमेदवार पात्र होण्यासाठी किती गुण निश्चित करण्यात आले आहेत अशी विचारणा केली असता उमेदवाराला ४५ टक्के गुणांची पात्रता शासन स्तरावरून निश्चित केली आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे उभे आरक्षण व आडवे आरक्षण काढावे लागते. मूळ आरक्षण हे अनुसूचित जमातीसाठी आहे व आडवे आरक्षण हे अनुसूचित जमातीतील माजी सैनिक या प्रवर्गासाठी आहे.

समितीने, सरळसेवा वर्ग-४ मध्ये एकूण राखीव पदे ३७ असून १७ पदे भरलेली आहेत. म्हणजे २० पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असण्याचे कारण काय आहे व ही पदे कधीपासून रिक्त आहेत अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, शासनाने दिनांक २ जून, २०१५ व दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीकरिता काही निर्बंध घातले आहेत. त्यामुळे मागील पदभरती कार्यक्रमामध्ये शिपाई संवर्गाचा समावेश करण्यात आला नव्हता. शासनाला गट ' ड ' संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करावयाची आहेत. त्यामुळे सेवानिवृत्ती, पदोन्नती यामुळे जी पदे रिक्त होतील ती टप्प्याटप्प्याने निरसित करावयाची आहेत. तथापि, शासनाकडून पदभरतीस मान्यता मिळताच शिपाई संवर्गातील ४ पदे भरण्यात येतील. तसेच हमाल कम स्वीपर या संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेले १ पद रिक्त आहे. कोतवाल संवर्गात १७ पदे

रिक्त होती. कोतवाल भरतीसाठी उप विभागीय अधिकारी यांना नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सर्व उप विभागीय अधिकारी यांना सदर पदे तातडीने भरावीत, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दिनांक ८ मे, २०१७ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील २ उमेदवार उपलब्ध झाल्याने २ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित १५ पदांसाठी उमेदवारांचे अर्जच प्राप्त न झाल्यामुळे ही पदे रिक्त राहिली आहेत.

**जात पडताळणी प्रमाणपत्र :—**

समितीने, वर्ग-३ मध्ये नियुक्ती देण्यात आलेले श्री. मारोती अलमोड व श्रीमती ज्योती अशोक मुडीराज, व तलाठी व कोतवाल संवर्गातील ५ कर्मचाऱ्यांचा जात प्रमाणपत्राचा प्रस्ताव कोणत्या समितीकडे केव्हा सादर करण्यात आला आहे असे विचारले असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, श्री. मारोती अलमोड यांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असून यांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र सादर केले होते. परंतु त्यांच्या प्रमाणपत्रामध्ये स्पेलिंग मिस्टेक असल्यामुळे जातपडताळणी समितीने तांत्रिक कारणास्तव त्यांचे प्रमाणपत्र खारीज करून एसडीएमकडून नवीन प्रमाणपत्र घेण्यास सांगितले आहे. त्यांची दिनांक २० आक्टोबर, २०१४ रोजी सरळसेवेने नियुक्ती झालेली आहे. जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने श्री. अलमोड यांना पुन्हा जातप्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास सांगितलेले आहे. नियुक्ती झाल्यानंतर सहा महिन्यात जातवैधता प्रमाणपत्र समितीकडे जातप्रमाणपत्र सादर करावे लागते.

समितीने त्यावर, संबंधित कर्मचाऱ्याने सहा महिन्यात जातवैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना उमेदवाराकडे जातवैधता प्रमाणपत्र दाखला असेल तर त्याची तातडीने नियुक्ती करण्यात यावी. जर उमेदवाराकडे जातवैधता प्रमाणपत्र नसेल तर त्यांना सादर करणेसाठी जास्तीत जास्त सहा महिन्याची मुदत आहे. या प्रकरणी दिनांक १८ मे, २०१३ चा शासन निर्णय लागू होतो. जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यांना नव्याने जातप्रमाणपत्र घेण्यास सांगितलेले आहे, त्यास नोकरीवर घ्या असे सांगितलेले नाही. एसडीएम कार्यालयाकडून जातप्रमाणपत्र देताना चूक झालेली आहे. अशापद्धतीने चूक होणे योग्य नाही, सदर प्रकरण गांभीर्याने घेतले पाहिजे. या प्रकरणामध्ये दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

श्रीमती ज्योती मुडीराज, तलाठी यांची दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी नियुक्ती झाली असून त्यांनी जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडे केव्हा प्रस्ताव पाठविला, अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी श्रीमती मुडीराज यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी जातप्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. श्रीमती मुडीराज यांची जातप्रमाणपत्राच्या आधारे नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे. श्रीमती मुडीराज यांचेकडून जातपडताळणी प्रमाणपत्र घेण्यास विलंब लावणाऱ्या अधिकारी/कर्मचारी

यांचेवर कारवाई करण्यात येईल. असे जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले. त्यानंतर समितीने श्रीमती मुडीराज यांची नियुक्ती ११ ऑगस्ट, २०१४ रोजीची असल्यामुळे दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले असल्यामुळे संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशांना शासकीय सेवेत सामावून घेतल्याचे देखील समितीच्या निदर्शनास येते. ही गंभीर बाब आहे. शासनाच्या नियमांचे पूर्णपणे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

समितीने, कोतवाल संवर्गातील किती जात प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केलेले नाहीत याबाबत माहिती देण्यास सांगितले असता विदित करण्यात आले की, श्री. काशिनाथ दगडू पवार यांची नियुक्ती दिनांक २२ जून, २०१५ ची असून त्यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी जात प्रमाणपत्र प्रस्ताव ठाणे समितीकडे सादर करण्यात आला आहे. श्री. सुनील बबन पवार यांचा नियुक्तीचा दिनांक २२ जून, २०१५ असून दिनांक १९ मे, २०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. श्रीमती रेश्मा चंद्रकांत जाधव यांचा नियुक्तीचा दिनांक १ जुलै, २०१५ असून दिनांक १७ मे, २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. श्री.अनंत शांताराम हिलम यांचा नियुक्तीचा दिनांक १ जुलै, २०१५ असून दिनांक १६ मे, २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. श्री. हिलम यांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी छाननीसाठी बोलाविले होते. परंतु ते आले नाहीत. तसेच त्यांना सेवेतून काढून का टाकण्यात येवू नये अशा प्रकारची दिनांक २६ मे, २०१७ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली आहे. श्री. सुरेंद्र मधुकर पवार यांचा नियुक्तीचा दिनांक २ जुलै, २०१५ असून प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. यासंबंधी श्री.सुरेंद्र पवार यांना पाच नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्यांनी अद्याप पर्यंत प्रस्ताव सादर न केल्यामुळे त्यांचे एप्रिल पासूनचे वेतन थांबविण्यात आलेले आहे

श्री. झिटे, तलाठी यांचा जात पडताळणी प्रस्ताव दिनांक ३१, डिसेंबर, २००८ रोजी जात पडताळणी समिती कोकण विभाग, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आला होता. दिनांक ५ मे, २०१७ रोजी जात पडताळणी समिती, ठाणे यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहिलो असल्यामुळे व लेखी म्हणणे दिले असल्यामुळे कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये असे श्री. झिटे यांनी कळविले आहे. श्री. झिटे यांच्या प्रकरणात जातपडताळणी समितीने दिनांक १७ मे, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कारवाई करून त्याचा अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निर्देश दिले. श्री. बी.आर.पिटलवार, लिपिक टंकलेखक, तहसीलदार कार्यालय, खेड, जिल्हा रत्नागिरी यांचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजीच्या आदेशान्वये श्री. पिटलवार, यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविले आहे. यावर श्री. पिटलवार, लिपिक यांनी दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडे रिट पिटीशन दाखल केले आहे.

**अनुसूचित जमातींसाठी राबवावयाच्या विविध योजना :–**

समितीने, रत्नागिरी जिल्ह्यात आदिम जमातीसह आदिवासींच्या विकासासाठी कोणकोणत्या योजना राबविण्यात येतात याबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिकाऱ्यांनी न्युक्लिअस बजेट अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. पारंपरिक मच्छीमारांसाठी मासे पकडण्यासाठी जाळे, बंधारा, मंडप, किराणा मालाचे दुकान, सौर दिवे अशा प्रकारच्या विविध योजना राबविण्यात येतात. थेट लाभार्थीच्या नावाने धनादेशाद्वारे राष्ट्रीयकृत आधार संलग्न बँक खात्यामध्ये सदर रक्कम जमा होते. पीटीसी प्लॅन अंतर्गत विट भट्टी ग्रुपसाठी पाच लाखाची योजना आहे. तसेच कुक्कुटपालन योजना प्रस्तावित केली आहे.

समितीने, अनुसूचित जमातीमधील काही आदिम जमातींची लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असल्या तरी या आदिम जमातींचा जीवनस्तर उंचाविण्यासाठी, त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून कातकरी समाजाचे लोक हे वर्षानुवर्षे मोलमजुरी करतात. त्यांना कुशल कामाचा कोणताही अनुभव नाही. त्यामुळे त्यांना व्यवसाय सुरू करण्यापूर्वी कुशल कामाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यांना कौशल्य विकास योजने अंतर्गत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे अशी सुचना केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी कौशल्य विकास योजने अंतर्गत कातकरी समाजातील तरूणांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. शासनाकडून ओटीएसपी व टीएसपी अंतर्गत विविध योजना राबविल्या जात आहेत व त्यांचा लाभ आदिम जमातींनाही दिला जात असतो समितीने सूचना केल्याप्रमाणे भविष्यात निश्चितपणे आम्ही त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करू. या जिल्ह्यामध्ये कातकरी समाज आहे. त्यांची सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे, उत्पन्नाचे कोणते साधन आहे, शिक्षणाची स्थिती काय आहे, याबाबतचा एक सर्व्हे करून घेऊ, असे समितीस विदित केले.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये पर्यटनासाठी भरपूर वाव आहे व या जिल्ह्यातील पर्यटनात फार मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. पर्यटन क्षेत्रात या समाजाला काही रोजगार उपलब्ध करून देता येईल का, या दृष्टीकोनातून एखादी योजना आपण आखणे, गरजेचे आहे. समितीच्या गणपतीपुळे दौऱ्यात लक्षात आले की, एका पर्यटन स्थळावरून दुसऱ्या पर्यटन स्थळाचे अंतर फार मोठे आहे. परंतु, या प्रवासात कोठेही पर्यटकांच्या चहा, अल्पोपहाराची व्यवस्था नाही. त्यादृष्टीकोनातून कातकरी समाजातील लोकांना काही स्टॉल्सचे वाटप करता येईल का, याचाही विचार आपण करावा. या समाजातील काही मुले ही शिकलेली असतील तर त्यांना फोटोग्राफीचे प्रशिक्षण देऊन आणि त्यासाठी लागणारी सामुग्री उपलब्ध करून देऊन फोटोग्राफीचा व्यवसाय सरू करण्यास आपल्याला मदत करता येईल. या संदर्भात आपल्याला जिल्हा नियोजन समितीमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील आणि या समाजासाठी काही नाविन्यपूर्ण योजना सुरू कराव्या लागतील असे समितीने सूचित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ जून, २०१७ रोजी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

**अनुसूचित जमातींच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :—**

समितीने, माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये जी भरती प्रक्रिया झाली होती त्यामध्ये तलाठी संवर्गात अनुसूचित जमाती प्रवर्गाचे १ पद रिक्त असल्याचे सांगण्यात आले होते. समितीच्या दौऱ्याच्या वेळी सरळ सेवा भरतीमध्ये वर्ग-४ मध्ये ३७ पदांपैकी रिक्त असलेली २० पदे भरण्यासाठी शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले होते. तसेच कोतवालाची १७ पैकी १५ पदे रिक्त होती. सद्यःस्थितीत ही पदे भरण्यात आली आहेत काय ? दुसरी बाब अशी की, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे भरण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या वेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना कळविण्यात येत नाही. असा मुद्दा उपस्थित केला असता अपर मुख्य सचिवांनी स्पष्ट केले की, महोदय, वित्त विभागाने दि.२५ मे, २०१७ रोजी असे निर्देश दिले आहेत की, प्रत्येक संवर्गाचा आकृतीबंध मंजूर झाल्याशिवाय पदे भरु नयेत. त्या निर्देशानुसार तलाठी संवर्गाचा आकृतीबंध अंतिम झाल्याशिवाय पदे भरता येत नाहीत. परिणामी, तलाठी संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गाचे १ पद रिक्त राहिलेले आहे. सदर १ पद भरण्यास अनुमती देण्याबाबतचा विशेष प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला आहे.परंतु सदरहू प्रस्तावाच्या संदर्भात वित्त विभागाने अंतिम निर्णय कळविलेला नाही.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत गेल्या १ वर्षापासून भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. ज्यावेळी भरती प्रक्रिया राबविण्यात येईल त्यावेळी शिपाई संवर्गाची पदे भरण्यात येतील. कोतवाल पदासाठी २०१७ मध्ये भरती प्रक्रिया राबविली होती.त्या भरती प्रक्रियेमध्ये १५ पैकी २ पदे भरण्यात आली.अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे १५ पदे रिक्त राहिली. तसेच मध्यंतरी जिल्ह्यामध्ये विधानपरिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्यामुळे पद भरती प्रक्रिया राबविता आली नाही. २०१७ मध्ये कोतवालाची २ पदे भरण्यात आली होती. परंतु त्यातील एका व्यक्तीने राजीनामा दिल्यामुळे व दुसरी व्यक्ती बडतर्फ झाल्यामुळे उक्त दोन्ही पदे रिक्त झालेली आहेत. सद्यःस्थितीत कोतवालांची एकूण १७ पदे रिक्त आहेत.तरत्नागिरी जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या कमी असल्यामुळे त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. आम्ही भरती प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते.शासनाकडून तलाठी व शिपाई संवर्गाची पदे भरण्यासाठी अद्यापपावेतो मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.मी अगोदर सांगितल्यानुसार २०१७ मध्ये भरती प्रक्रिया राबविली होती.त्या भरती प्रक्रियेत २ उमेदवार उपलब्ध झाले.सध्या जी पदे रिक्त आहेत ती भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविणार आहोत. सन २०१६ मध्ये तलाठी संवर्गाची पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविली होती. परंतु रत्नागिरी जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या कमी असल्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार मिळाले नाहीत. त्यामुळे ही पदे रिक्त राहिली.

समितीने यावर, समितीचा दौरा होऊन जवळजवळ १ वर्षे पूर्ण झाले आहे.या एक वर्षाच्या कालावधीत प्रशासनाकडून भरती प्रक्रियेच्या बाबतीत उचित कार्यवाही होणे अपेक्षित होते.परंतु आकृतीबंध मंजूर करण्याबाबतचा निर्णय हा धोरणात्मक असल्यामुळे समिती यावर जास्त चर्चा करु इच्छित नाही.ज्यावेळी आपणास शासनाकडून सदरहू पदे भरण्याची परवानगी मिळेल त्यावेळी अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे प्राधान्याने भरुन अनुसूचित जमाती प्रवर्गाचा अनुशेष दूर करावा. असे समितीने निदेश दिले.

**जात पडताळणी प्रमाणपत्र :—**

समितीने, श्री. अलमोड यांना उप विभागीय अधिकारी धर्माबाद, जि. नांदेड यांच्याकडून जात प्रमाणापत्र वितरित करण्यात आले. परंतु सदरहू जात प्रमाणपत्रात स्पेलींग मिस्टेक असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. समितीच्या निदेशानुसार संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली ? तसेच श्री.अलमोड यांच्या सेवा कालावधीच्या बाबतीत समितीला अवगत करण्यास सांगितले असता जिल्हाधिकाऱ्यांनी समितीस खालील प्रमाणे अवगत केले.

श्री. मारोती अलमोड यांची नेमणूक दि. ११ ऑगस्ट, २०१४ रोजी झाली होती. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी दोन महिन्यांच्या कालावधीत म्हणजेच दि.२० आक्टोबर, २०१४ रोजी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबादकडे अर्ज सादर केला होता. परंतु जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रामध्ये स्पेलींग मिस्टेक असल्याच्या तांत्रिक कारणास्तव श्री.अलमोड यांचा अर्ज खारीज केला. श्री.अलमोड यांचे जातीचे प्रमाणपत्र उप विभागीय अधिकारी धर्माबाद, जि.नांदेड यांच्याकडून प्राप्त झाले आहे. सदरहू प्रकरणाचा अहवाल जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे पाठविला आहे.तसेच श्री.अलमोड यांनी नवीन जात प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केला आहे. अशाच प्रकरणांच्या बाबतीत माननीय उच्च न्यायालयात रिट दाखल झालेली आहे. माननीय उच्च न्यायालयाने मराठवाड्यातील सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला सूचना दिल्या आहेत की, जर जातीच्या प्रमाणपत्रामध्ये स्पेलींग मिस्टेक असली तरी संबंधित जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्राची पडताळणी करावी. श्री.अलमोड यांच्या प्रकरणाबाबत आम्ही औरंगाबादच्या समितीकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सदरहू प्रकरण पुन्हा उपस्थित करून कार्यवाहीस्तव प्रलंबित आहे. उक्त जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तीन वेळा पत्र व्यवहार करून श्री.अलमोड यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी तातडीने करण्याबाबत कळविलेले आहे.औरंगाबाद जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अंतिम निर्णय न दिल्यामुळे श्री.अलमोड यांनी पुन्हा औरंगाबाद उच्च न्यायालयात दावा दाखल केला. माननीय उच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला ९ महिन्यात श्री.अलमोड यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करून निर्णय घेण्याचे आदेश दिलेले आहेत. सदरहू मुदत ऑक्टोबर, २०१८ मध्ये संपणार आहे. समितीने दिलेल्या निदेशानुसार श्री.अलमोड यांचे जात प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे.

दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी जातीचे प्रमाणपत्र पुन्हा सादर करण्याचे आदेश होते.त्यानुसार त्यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे जात प्रमाणपत्र सादर केले. परंतु दरम्यानच्या काळात न्यायालयाच्या आदेशानुसार जात पडताळणी समितीने सदरहू प्रकरण मूळ कागदपत्रासह पुन्हा उपस्थित केले. उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांच्याकडे जात प्रमाणपत्राची पुनर्तपासणी करून देण्याबाबतचा अर्ज सादर केला आहे. जात पडताळणी समितीने माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार मूळ कागदपत्रांच्या आधारावर हे प्रकरण पुन्हा तपासणी केले आहे. या प्रकरणी पुन्हा उप विभागीय अधिकारी धर्माबाद यांच्याकडे विचारणा करण्यात येईल. समितीने यावर, मुळात ही अतिशय गंभीर बाब आहे. २०१४ मध्ये श्री.अलमोड यांची नेमणूक करण्यात आली होती. दि. १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सरळ सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे.समितीला असे वाटते की, आपण सदरहू कर्मचाऱ्यास हा शासन निर्णय अवगत करून दिला असेल. परंतु सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी केल्याचे दिसत नाही.

श्री. अलमोड यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने समितीचे समाधान न झाल्यामुळे विभागाने पुन्हा एकदा या प्रकरणी सखोल चौकशी करून समितीला सविस्तर अहवाल सादर करावा.एकाच विषयावर आपण इतका वेळ देऊन सुध्दा समितीचे पूर्णपणे समाधान होत नाही.त्यामुळे या प्रकरणी पुन्हा समितीला अहवाल सादर करावा.

समितीने श्रीमती ज्योती मुडीराज यांची ११ ऑगस्ट, २०१४ रोजी तलाठी या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र त्यांना नियुक्ती दिल्यापासून पुढील ६ महिन्यांमध्ये हे जात प्रमाणपत्र का प्राप्त करून घेण्यात आले नाही आणि त्यांच्याविरुध्द दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही का करण्यात आली नाही अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की,

श्रीमती ज्योती मुडीराज यांची ११ ऑगस्ट, २०१४ रोजी तलाठी या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी जात वैधता प्रमाणपत्र समितीला सादर केलेले आहे. यामध्ये २ वर्षाचा जो विलंब झाला तो का झाला आणि ६ महिन्याच्या आत कार्यवाही का करण्यात आली नाही, असा मुद्दा होता. त्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे असा विषय होता. त्यावेळी नियुक्ती प्राधिकारी उप विभागीय अधिकारी होते.या प्रकरणी उप विभागीय अधिकारी, संबंधित नायब तहसीलदार आणि संबंधित लिपिक या तिघांनाही कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. त्या नोटीसींना त्यांनी उत्तर देताना सांगितले की संबंधित तलाठी श्रीमती मुडीराज या सेवेत रुजू झाल्यानंतर प्रसुती रजेवर होत्या. त्या रजेवरून सेवेत पुन्हा रुजू झाल्यानंतर त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आणि जेव्हा त्यांना नियमित आदेश दिला त्यानंतर त्यांनी विहित ६ महिन्यांच्या आत संबंधित जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे त्यांचे जातीचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. असे असले तरीही आम्ही या संबंधित तिन्ही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेतली आहे व त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे की पुन्हा भविष्यात त्यांच्याकडून अशा प्रकारे दिरंगाई होणार नाही.

श्रीमती मुडीराज यांच्या प्रकरणी जात प्रमाणपत्र समितीने जो निर्णय दिला होता त्या अनुषंगाने त्या मा. उच्च न्यायालयामध्ये गेल्या होत्या आणि या विषयी मा. उच्च न्यायालयाने जात वैधता समितीला असे आदेश दिले आहेत की त्यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ पासून पुढील एक वर्षात त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासंबंधी निर्णय घ्यावा अशी मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र या एक वर्षात सुद्धा संबंधित जात वैधता प्रमाणपत्र समितीने सदर प्रकरणी निर्णय न घेतल्यामुळे त्या पुन्हा न्यायालयात गेल्याने न्यायालयाने त्यांना पुन्हा ९ महिन्यांची मुदत दिली.

समितीने, तलाठी श्री. जिटे व श्री. बी. आर. पीटलवार, लिपिक यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले होते तर त्यानंतर आपण त्यांच्या बाबतीत कोणती कार्यवाही केली आहे. असे विचारले असता जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, श्री. जिटे जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले असल्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकण्यासंबंधी आम्हाला पत्र देऊन कळविले होते. त्या आदेशाविरुद्ध संबंधित तलाठी न्यायालयात गेले आहेत. संबंधित जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र दिनांक १७ मे, २०१७ रोजी अवैध ठरविले आहे. त्यानंतर लगेच जिल्हा परिषदेने पुढील महिन्यात त्यांना दिनांक १२ जून २०१७ रोजीच्या नोटीसद्वारे खुलासा विचारण्यात आला आहे. त्यानंतर तो न्यायालयात गेला. दिनांक २७ मे, २०१७ रोजीच्या आदेशावरून तो न्यायालयात गेला आहे. त्यानंतर दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या आदेशात असे म्हटले आहेत की, " No further step will be taken before hearing the petitioner up to the impugned order ". अशा प्रकारे न्यायालयाने या प्रकरणी जैसे थे आदेश दिले आहेत.

जात वैधता प्रमाणपत्र समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या आदेशान्वये अवैध ठरविले आहे. त्यानंतर आम्ही त्यांना एका महिन्यात म्हणजे दिनांक १२ जून, २०१७ रोजी सेवेतून कमी करण्यासंबंधी नोटीस दिली.

श्री. बी. आर. पीटलवार, लिपिक टंकलेखक, तहसील कार्यालय, खेड याचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी प्रकरणी सुद्धा संबंधित कर्मचारी हायकोर्टामध्ये गेला आहे. हायकोर्टाने या प्रकरणी संबंधित जात पडताळणी समितीला निर्णय घेण्यासाठी १ वर्षाची मुदत दिली होती.ती मुदत सुद्धा दिनांक ५ मे, २०१७ रोजी संपली आहे. अद्याप या प्रकरणी कोणताही निर्णय झालेला नाही. आम्ही संबंधित जात पडताळणी समितीला ३ वेळा पत्र पाठविले आहे. त्यांनी आम्हाला असे उत्तर दिले आहे की हे प्रकरण आम्ही पोलीस दक्षता पथकाकडे चौकशीसाठी पाठविले आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर आम्ही या प्रकरणी निर्णय देऊ. त्यामुळे सध्या हे प्रकरण त्या समितीकडे प्रलंबित आहे.

**अनुसूचित जमातींसाठी राबवावयाच्या विविध योजना :—**

समितीने, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी तसेच जो कातकरी समाज आहे त्यांचा आर्थिक स्तर सुधारण्यासंबंधी केंद्रवर्ती तसेच उप योजना व योजनाबाह्य क्षेत्राअंतर्गत कोणकोणत्या योजना

राबविण्यात येतात व त्यातून किती व्यक्तींना लाभ मिळाला आहे. यासंबंधी डीपीसीमधून ज्या योजना राबविण्यात येतात त्याची माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, महोदय, माननीय विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कातकरी उत्थान अभियान हे संपूर्ण कोकण विभागामध्ये राबविण्यात आले आहे. हे कातकरी एका जागेवरून दुसऱ्या जागेवर स्थलांतरित होत असतात. त्यामुळे त्यांना गॅस प्रमाणपत्र देता येत नाही. त्या योजनेपासून हे लोक वंचित राहतात. त्यामुळे हे गॅस प्रमाणपत्र देता यावे यासाठी या विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण झाल्यानंतर गॅस प्रमाणपत्र, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, संजय गांधी निराधार योजनेचा दाखला, अशी विविध प्रमाणपत्रे त्यांना दिलेली आहेत. कातकरी उत्थान अभियान, कौशल्य विकास योजना इत्यादी योजना राबविण्यात येतात.

**अभिप्राय व शिफारशी :**

**रिक्त पदांचा अनुशेष :—**

(१) समितीने दिनांक ७ जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग-३ मधील सरळसेवेसाठी आरक्षित असलेल्या पदांमध्ये तलाठी या वर्गातील एक पद रिक्त असल्याचे आढळून आले. तलाठी संवर्गामध्ये २८ पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव असून २७ पदे भरण्यात आली आहेत. या वर्गात १ पद रिक्त असून ते अनुसूचित जमाती (माजी सैनिक) या प्रवर्गासाठी राखीव आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्याची कार्यवाही करताना त्याची माहिती प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना देणे आवश्यक आहे. माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये भरती प्रक्रिया झाली होती. परंतु निवड यादीमध्ये समाविष्ठ होण्यासाठी आवश्यक असणारे गुण प्राप्त करणारा एकही उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे सदरचे पद रिक्त राहिले आहे व यासाठी उमेदवाराला ४५ टक्के गुण मिळणे अनिवार्य आहे.

माजी सैनिकांसाठी शासनाने ४५ टक्के गुणांची पात्रता निश्चित केली आहे. त्यामुळे माजी सैनिकांसाठी राखीव असलेली पदे वर्षानुवर्ष रिक्त राहतात ही बाब अतिशय गंभीर आहे. भविष्यात अशा घटना घडू नये या दृष्टीने व माजी सैनिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने माजी सैनिकांसाठी ठेवण्यात आलेली ४५ टक्के गुणांची पात्रता कमी करणे योग्य होईल. **त्यामुळे याबाबत समिती अशी शिफारस करते की, माजी सैनिकांसाठी असणारी ४५ गुणांची पात्रता कमी करण्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.**

(२) समितीच्या दौऱ्याच्या वेळी सरळ सेवा भरतीमध्ये वर्ग-४ मध्ये ३७ पदांपैकी रिक्त असलेली २० पदे भरण्यासाठी शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले होते तसेच कोतवालांची १७ पैकी १५ पदे रिक्त असल्याचेही सांगण्यात आले होते. विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी सदर पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीचा दौरा झाल्यानंतर १ वर्षानी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली या एक वर्षाच्या कालावधीत प्रशासनाकडून भरती प्रक्रियेच्या बाबतीत उचित कार्यवाही होणे अपेक्षित होते. तथापि याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाल्याचे समितीला दिसून आले नाही त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. आकृतीबंध मंजूर झाल्याशिवाय पदे भरण्यात येऊ नयेत असे शासनाचे निर्देश असले तरी आकृतीबंध मंजुरीसाठी इतका विलंब लागणे हे खचितच योग्य नाही. याबाबत कार्यालयाने पाठपुरावा करणे आवश्यक आहे. **उक्त परिस्थिती पाहता समिती अशी शिफारस करते की, आकृतीबंध मंजूर करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने लवकरात लवकर घ्यावा व त्यानुसार अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील रिक्त पदे प्राधान्याने भरून अनुशेष दूर करावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी.**

**जातपडताळणी :—**

जिल्हाधिकारी कार्यालयातील **वर्ग** ३ मध्ये नियुक्ती देण्यात आलेले व जात पडताळणी प्रलंबित असलेले श्री. मारोती अलमोड व श्रीमती ज्योती अशोक मुडीराज यांच्यासह तलाठी व कोतवाल संवर्गातील ५ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी सन २०१४ पासून झाली नसल्याचे आढळून आले आहे. नियुक्ती झालेल्या संबंधित कर्मचाऱ्यांनी सहा महिन्यांत जातवैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती करताना उमेदवारांकडे जातवैधता प्रमाणपत्र दाखला असेल तर त्याची तातडीने नियुक्ती करण्यात यावी. जर उमेदवाराकडे जातवैधता प्रमाणपत्र नसेल तर त्यांना जास्तीत जास्त सहा महिन्यांची मुदत आहे. उक्त प्रकरणी १८ मे, २०१३ चा शासन निर्णय लागू होतो. तसेच श्री. अलमोड यांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने नव्याने जातप्रमाणपत्र घेण्यास सांगितलेले आहे, उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून प्रमाणपत्र देताना चूक झालेली आहे. अशा पद्धतीने चूक होणे ही गंभीर बाब आहे. तलाठी श्री. जिठे व लिपिक श्री. बी.आर. पीटलवार यांचीही जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत अशी अनेक वर्षे प्रकरणे प्रलंबित राहिल्याने मूळ व खऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय होत असतो. **श्री. अलमोड यांना जात प्रमाणपत्र देताना तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी कोणतीही शहानिशा न करता जात प्रमाणपत्र दिलेले आहे. असे चुकीचे जात प्रमाणपत्र देण्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांवर नियमानुसार चौकशी करून कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सरळ सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. तर त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. **तथापि, येथे सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत विभागाने पाठपुरावा करून सदर प्रकरणे निकाली काढावीत व त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करावा.**

**अनुसूचित जमातीसाठी राबवावयाच्या विविध योजना :—**

समितीने दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी घेतलेल्या साक्षीच्यावेळी अनुसूचित जमातीमधील आदिम जमातीची लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याचे विभागाच्या लक्षात आणून दिले. यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असल्या तरी या आदिम जमातीचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी तसेच त्यांना व्यवसाय सुरू करण्यापूर्वी कुशल कामाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याने त्यांना कौशल्य विकास योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यात यावे. **जिल्ह्यातील कातकरी समाजाची सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे, उत्पन्नाचे कोणते साधन आहे, शिक्षणाची स्थिती काय आहे याबाबतचे सर्वेक्षण लवकरात लवकर करून घ्यावे व त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## जिल्हापरिषद, रत्नागिरी

अनुसचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ते ९ जून, २०१७ या कालावधीत आयोजित केलेल्या रत्नागिरी जिल्हा दौऱ्यादरम्यान दिनांक ७ जून, २०१७ रोजी जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे बैठक घेतली. सदर बैठकीच्यावेळी समितीने जिल्हा परिषदेच्या विविध विभागांची माहिती घेतली.

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र :—**

समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील कनिष्ठ/ सहायक वरिष्ठ/विस्तार अधिकारी व चालक संवर्गातील एकूण ९ पदे विविध कारणांनी रिक्त असून वर्ग-४ मध्ये १२ पदाचा अनुशेष आहे. सदर अनुशेषाची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विदित केले की, कनिष्ठ सहायक ६ पदे, वरिष्ठ सहायक १ पद, विस्तार अधिकारी १ पद आणि वाहनचालक १ पद असा एकूण ९ पदांचा अनुशेष आहे. माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये भरती प्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर भरती प्रक्रिया न झाल्यामुळे हा अनुशेष राहिलेला आहे. पुढील वर्षी भरती होईल त्यावेळी हा अनुशेष भरला जाईल. कनिष्ठ सहायकांची दोन पदे आंतरजिल्हा बदलीने रिक्त झालेली आहेत. तसेच दोन कनिष्ठ सहाय्यकांची वरिष्ठ सहायक पदावर पदोन्नती झालेली आहे. दोन पदे रिक्त आहेत त्यापैकी एक पद माजी सैनिकांसाठी राखीव आहे. एका पदावर कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी इंग्रजी टंकलेखनाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना कमी करण्यात आले आहेत. कनिष्ठ सहायकांचा ६ पदांचा अनुशेष आहे. यापैकी दोन कर्मचाऱ्यांची दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी पदोन्नती झाल्यामुळे ती पदे रिक्त आहेत. मागे भरती प्रक्रिया झाली त्यामध्ये माजी सैनिकाचे पद मिळालेले नाही, त्यामुळे ती पदे रिक्त आहेत. एका कर्मचाऱ्याने इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यास कमी करण्यात आले होते. दोन कर्मचाऱ्यांची आंतरजिल्हा बदलीमुळे त्यांना कार्यमुक्त केलेले असल्यामुळे पदे रिक्त आहेत. भरती प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याचा आमचा प्रयत्न सुरू असून सर्व पदे भरली जातील.

समितीने सामान्य प्रशासन विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातून संवर्ग निहाय एकूण १६ पदे व वर्ग-४ मध्ये २५ पदे भरण्यात आली आहेत. ही पदे भरण्यापूर्वी कर्मचाऱ्यांकडून जातपडताळणी प्रमाणपत्र घेतले होते काय, विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नमूद केले की, एकूण १६ पैकी ८ कर्मचाऱ्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र आहे. चार कर्मचाऱ्यांनी सन २०१६ मध्ये जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती नोव्हेंबर २०१५ मधील आहे. दोन कर्मचाऱ्यांचा एसबीसीमध्ये समावेश केलेला आहे. जिल्हापरिषदेच्या ६ प्रकरणांपैकी ५ कर्मचाऱ्यांना सुनावणीसाठी बोलाविले होते. ही ठाकर प्रवर्गातील प्रकरणे आहेत. श्री.रोडे यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र फेटाळले होते त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचा दाखला सादर केलेला आहे. तर दोन कर्मचाऱ्यांनी २०१६ मध्ये जातवैधता पडताळणी समितीकडे अर्ज सादर केलेले आहेत.

समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील ग्रामसेवक संवर्गातील एकूण ८ पदांचा अनुशेष केव्हापासून रिक्त आहे. सदर अनुशेषाची पदे भरणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास सांगितले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१६ मध्ये पदोन्नतीने दोन पदे रिक्त झाली आहेत. एक उमेदवार मिळालेला आहे. सन २०१७ मध्ये दोन कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिलेला आहे. सन २०१५ पासून तीन पदे रिक्त आहेत. दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी परीक्षा झाली होती त्यावेळी अनुसूचित जमातीची १० पदे होती. त्यावेळी ७५ टक्के पद भरतीची मर्यादा असल्यामुळे ७ पदे भरलेली आहेत. सन २०१५ मध्ये भरती झाली त्यामध्ये श्री.डांगले यांना दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत. त्यांनी औरंगाबाद समितीकडे जातप्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज केलेला आहे असे सांगितले.

समितीने, ग्रामपंचायत विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातून संवर्गनिहाय एकूण ४१ पदे भरण्यात आली. पदे भरण्यापूर्वी कर्मचाऱ्यांकडून जातवैधता प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ४१ पैकी ३८ कर्मचाऱ्यांची जातवैधता प्रमाणपत्र आहेत. तीन उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्या तीन कर्मचाऱ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र समितीकडे अर्ज सादर केलेले आहेत. श्रीमती रेश्मा ठाकूर यांना नोटीस दिली असून दिनांक १७ मे, २०१७ रोजी त्यांची सुनावणी झालेली आहे. सन २००४ ची त्यांची नियुक्ती आहे. त्यांनी दिनांक ५ जानेवारी, २००७ रोजी जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर केलेले आहे.

सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती यांनी पुढे असेही सांगितले की, ठाकर प्रवर्गाबाबत याचिका सादर केली आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे गेली आहेत. ठाकर प्रवर्गातील प्रकरणे उच्च न्यायालयात एकत्रित सुनावणीसाठी होती. त्यामुळे ही प्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे प्रलंबित ठेवा अशी अर्जदारांची मागणी होती. पूर्वीच्या रत्नागिरीमधील ठाकर प्रवर्ग भटक्या जमातीमध्ये होते. त्यानंतर १९७६ मध्ये प्रादेशिक बंदी उठवली. ठाकर-ठाकूर प्रवर्ग ५ जिल्ह्यातील २५ तालुक्यात होते. रत्नागिरीमधील ठाकर भटक्या जमातीमध्ये होते तर उर्वरित जिल्ह्यातील ठाकर हे इतर

मागासवर्गामध्ये होते. ठाकर प्रवर्ग वेगवेगळ्या जातीमध्ये देखील होता. सन १९७६ मध्ये क्षेत्रिय बंदी उठविली त्यावेळी इतर विभागातील ठाकर-ठाकूर हे अनुसूचित जमातीचे फायदे मागू लागले त्यामुळे ही गुंतागुंत निर्माण झालेली आहे.

समितीने, पर्यवेक्षिका या संवर्गामध्ये अनुसूचित जमातीचा एकूण २ पदांचा अनुशेष आहे. सदर पदे भरण्याबाबत कोणती कारवाई केली असे विचारले असता जिल्हा परिषदेतर्फे सदर पदे ही सन २०१२-२०१३ पासून पात्र उमेदवार न मिळाल्यामुळे रिक्त आहेत. पद भरतीसाठी जाहिरात दिली होती. अंगणवाडी सेविकेमधून ही पदे भरली जातात. परंतु, पात्र उमेदवार मिळत नसल्यामुळे ही पदे रिक्त राहतात. रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित संवर्गातील अंगणवाडीसेविका खूपच कमी आहेत. दहावी पास असलेला अनुसूचित जमातीचा उमेदवार मिळत नाही ही मूळ अडचण आहे.

अंगणवाडी सेविकांच्या नियुक्तीची अट दहावी पास आहे. तथापि, दहावी पास असलेल्या अंगणवाडीसेविका उपलब्ध होत नसतील तर शासनाकडे पत्रव्यवहार करून नियमामध्ये सूट मिळवून घेतली असेल. आपल्या जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्याअंगणवाडी सेविका नसतील तर उर्वरित आदिवासी जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या अंगणवाडीसेविका भरल्या जातील काय ? तसेच अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या रिक्त पदावर अन्य जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवारांना संधी उपलब्ध करून देता येईल का, याबाबत निर्णय घ्यावा असे समितीने सुचित केले.

समितीने, विस्तार अधिकारी एक पद न्यायप्रविष्ठ आहे, या पदाची जाहिरात देताना कोणते निकष नमूद करण्यात आले अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, श्रीमती तोटेवार यांची दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी सरळसेवेद्वारा नियुक्ती करण्यात आली होती. विस्तार अधिकारी पदासाठी मान्यता प्राप्त शाळेतील तीन वर्षाच्या अनुभवाची अट होती. श्रीमती तोटेवार यांना तीन वर्षाचा अनुभव नाही अशाप्रकारची तक्रार प्राप्त झाली होती. त्यांना अनुदानित शाळेत तीन वर्षे काम केल्याचा अनुभव नव्हता. त्यांना अनधिकृत शाळेतील अनुभव होता. त्यामुळे ते प्रकरण न्यायप्रविष्ठ झालेले आहे. श्रीमती तोटेवार यांना सेवेतून काढून टाकल्यामुळे त्या न्यायालयात गेल्या. या प्रकरणी निर्णय झालेला नाही.

त्यानंतर समितीने, केंद्र प्रमुख संवर्गात ७ पदांच्या अनुशेषासह एकूण ८० पदांचा अनुशेष असण्याची कारणे विचारली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०१० चे निर्णयानुसार केंद्र प्रमुखाचे पद सरळसेवेने व स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्यात येते. ही पदे भरण्याची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येते. राज्यस्तरावर एकत्रित जाहिरात देऊन ही पदे भरण्यात येतात. विभागीय परीक्षा न झाल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत. एकूण ८० पदांमध्ये विस्तार अधिकारी २ पदे, केंद्र प्रमुख १२ पदे आणि प्राथमिक शिक्षक ६६ पदे असा एकूण ८० पदांचा अनुशेष आहे. प्राथमिक शिक्षक संवर्गात ६६ पदांचा अनुशेष आहे. ही पदे सन २०१० पासून रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबत ग्रामविकास विभाग आणि शिक्षण विभागाला वारंवार कळविलेले आहे. कोकण विभागाला देखील कळविलेले आहे. जिल्हयात अतिरिक्त शिक्षक नाहीत.

समितीने, अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ४७४ आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र घेतले आहे काय अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी १० कर्मचाऱ्यांची जातपडताळणी प्रमाणपत्र सादर झालेली नाही. दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत न्यायालयाकडून निर्णय झालेला आहे की, चार महिन्याच्या आत त्यांना जातवैधता प्रमाणपत्र द्यावे. १० कर्मचारी सोडले तर अन्य सर्व कर्मचाऱ्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र आहेत असे नमूद केले असता समितीने सरळसेवेने भरती झालेल्या व पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करावी असे निदेशित केले.

**अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना :—**

समितीने, शिक्षण विभागाकडे विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी किती निधी प्राप्त झाला आहे व त्यातील किती निधी खर्च झाला आहे तसेच सदर निधी कोणत्या योजनांवर खर्च झाला आहे याची संक्षिप्त माहिती देण्यास सांगितले असता शिक्षणाधिकाऱ्यांनी विदित केले की, विशेष घटक योजने अंतर्गत इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलींना उपस्थिती भत्ता देण्यात येतो. शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य शाळांमधील अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देण्यात येतो. यासाठी विद्यार्थ्यांची ८० टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

यावर समितीने सन २०१२ मध्ये अनुसूचित जमातीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ३६०१ होती, ती सन २०१३-२०१४ मध्ये ५१८० झाली, सन २०१४-२०१५ मध्ये ३१७४ झाली, सन २०१५-२०१६ मध्ये ३००५ झाली, सन २०१६-२०१७ मध्ये ३४२७ झाली. म्हणजे सन २०१३-२०१४ मध्ये ५१८० विद्यार्थी असताना पुढील वर्षी २००० विद्यार्थी कमी झाले आहेत. लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या सर्व ठिकाणी समान असली पाहिजे.कारण, विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना आहेत व प्रत्येक योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो. एका योजनेचे लाभार्थी अधिक आणि दुसऱ्या योजनेचे लाभार्थी कमी, असल्याचे लक्षात आणून दिले असता सदरची आकडेवारी ऑनलाईन असते त्यावरून ही संख्या दर्शविलेली आहे, ती तपासून पाहण्यात येईल असे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ जून, २०१७ रोजी रत्नागिरी जिल्हा परिषद कार्यालयास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :—**

साक्षीच्यावेळी समितीने जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी कनिष्ठ सहायकाची ६ पदे व इतर काही पदे मिळून एकूण ९ पदांचा अनुशेष होता सदर अनुशेषाची पदे भरण्यात आली आहेत काय आणि भरण्यात आली असल्यास संबंधित कर्मचाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्रे मिळविण्यात आली आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता सचिवांनी विदित केले की, वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या पदांच्या भरतीसंबंधीचे अधिकार जरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असले तरी आता आपण संपूर्ण राज्यामध्ये ऑफलाईन परीक्षा एकाच दिवशी घेत होतो. या परीक्षेसाठी हजारो उमेदवार बसतात आणि ते घेणे शक्य व्हावे म्हणून त्याचे टाईमटेबल व त्याची पद्धत ग्रामविकास विभागाकडून निश्चित करण्यात येते. या जिल्ह्यातील भरती झाल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला होता की आता ऑफलाईन ऐवजी आपण ऑनलाईन भरती करु. त्यानुसार आम्हाला परवानगी सुध्दा मिळाली होती व ग्रामविकास विभागाने तसा शासन निर्णय सुध्दा काढला होता. मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये वित्त विभागाने साधारणपणे १ वर्षापूर्वी " जोपर्यंत जिल्हा परिषदा त्यांच्या आकृतीबंध पूर्ण करीत नाहीत आणि दुसऱ्यांदा त्यासाठी परवानगी घेत नाहीत तोपर्यंत जिल्हा परिषदांमधील पदभरती करू नये " असे आदेश काढले होते. त्यामुळे ही पदभरती थांबली होती. आता दोन तीन महिन्यांपूर्वी महाभरतीच्या प्रक्रियेमध्ये ती पदभरती करण्यास परवानगी मिळाली आहे. कार्यालयाने या पदभरतीची पूर्ण तयारी झाली असून आरक्षणाचा मुद्दा सुरू झालेला असल्यामुळे आता भरती थांबविण्यात आली आहे. वित्त विभागाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर आम्ही ही पदभरती प्रक्रिया करण्याची पूर्तता करू. त्यामुळे हा प्रश्न आता राज्य शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. याबाबतचा निर्णय राज्य शासन घेईल. हा निर्णय राज्यातील संपूर्ण विभागांसाठी असेल. भरती करण्याची शासनाला विनंती केलेली आहे. प्रत्येक कॅडरमध्ये बिंदू नामावलीप्रमाणे किती भरती प्रत्येक जिल्ह्यामध्ये करावयाची आहे त्याची जाहिरात द्यावी लागेल. यामध्ये ऑनलाईन प्रक्रिया राबवावी लागणार असल्यामुळे त्याबाबत राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने ही परीक्षा घेण्यासाठी जी समिती नियुक्त केलेली आहे त्यांच्यासमवेत चर्चा झाल्यानंतर सदर भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

यावर समितीने, अनेक वर्षापासून रिक्त असलेली ही पदे भरण्यासाठी लोक वाट पाहत आहेत. रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ होत असल्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की लोकांची कामे तत्परतेने व्हावीत अशी अपेक्षा आहे. त्यामुळे याबाबत विनाकारण इश्यू न होता ही रिक्त पदे तातडीने भरणे अपेक्षित असल्याने साधारणपणे ही पदे भरण्याची प्रक्रिया कधीपर्यंत सुरू होईल अशी आपल्याला अपेक्षा आहे. हा विलंब झाल्यामुळे वर्षानुवर्षे अभ्यास करून जे विद्यार्थी एज फॅक्टरमुळे परीक्षेला बसू शकले नसल्यामुळे त्यांच्यावर नोकरीच्या बाबतीत अन्याय झाला आहे. त्यामुळे विभागाचे सचिव म्हणून मुख्य सचिव महोदयांशी तातडीने बोलले तर बरे होईल. आमची समिती तर त्याबाबत शिफारस करणारच आहे. परंतु आपण माननीय मुख्य सचिवांशी बोलून तातडीने त्यासंबंधीचा निर्णय घेण्याबाबत बोलावे. तसेच या बैठकीमध्ये झालेल्या बैठकीचा संदर्भही दिला तरी चालेल.

**जात पडताळणी प्रमाणपत्र :—**

समितीने, जिल्हा परिषद, रत्नागिरी येथील सामान्य प्रशासन विभागामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील १६ पैकी ८ कर्मचाऱ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे आणि उर्वरित ८ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही तर त्यासंबंधीची सद्यःस्थिती समितीला सादर करण्यात यावी आणि अद्यापपर्यंत काही कर्मचाऱ्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे. तसेच जिल्हापरिषदेकडे २ पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातील होती. ती पदे विशेष मागास प्रवर्गामध्ये रूपांतरित केली होती. त्याबाबत सुद्धा समितीला माहिती द्यावी. कारण अनुसूचित जमातीच्या बिंदुवर ते कर्मचारी नियुक्त झाले होते व त्यानंतर त्यांनी विशेष मागास प्रवर्गाच्या बिंदुवरील प्रमाणपत्र सादर केले आहे असा मुद्दा उपस्थित केला असता सचिवांनी खुलासा केला की, सदर ८ कर्मचारी हे कनिष्ठ अभियंता या संवर्गातील होते. सन १९९५ नंतर भरती होऊन अनुसूचित जमातीऐवजी विशेष मागास प्रर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर केले तर संबंधित कर्मचाऱ्याची नोकरी जाणार, त्यांना संरक्षण नाही. सन १९९५ पूर्वीचे ८ लोक असे होते की त्यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते परंतु दिले नाही. त्यापैकी श्री. अहिरेकर यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज देखील केला नव्हता. जर त्यांनी अर्ज केला असता तर संरक्षण मिळाले असते. श्री. देवकीनंदन नरसिंग सपकाळे या कर्मचाऱ्याने विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र दिल्याने त्यांना विशेष मागास प्रवर्गात हलविण्यात आले असून त्यामुळे सदर बिंदू मोकळा झाला आहे. इतर सर्व कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले आहे. यापैकी श्री. शंकर मेडेवाड यांची नांदेड येथे आंतरजिल्हा बदलीमध्ये बदली झाली आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या बिंदुंवर जात वैधता प्रमाणपत्र असलेलेच कर्मचारी कार्यरत आहेत.

जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उर्वरित दोन कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्याला सेवेतून कमी करण्यात आले तर दुसऱ्याला एस.बी.सी. प्रवर्गामध्ये हलविण्यात आले. त्यावेळी असा मुद्दा समोर आला होता की, सदर कार्यवाहीस फार विलंब झाला आहे. कार्यवाहीस विलंब झाल्यामुळे बिंदू रिक्त झाले नाहीत व त्यामुळे दरम्यानच्या कालावधीमध्ये झालेल्या भरती प्रक्रियेमध्ये सदर पद भरले गेले नाही व या कारणाने खरोखर अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये असणाऱ्या लोकांवर अन्याय झाला आहे असे निदर्शनास आणले असता सचिवांनी नमूद केले की, सदर कार्यवाहीस २० वर्षे लागली ही वस्तुस्थिती आहे. ज्या कर्मचाऱ्यास सेवेतून कमी केले तो कर्मचारी सन १९८८ मध्ये सेवेत रुजू झाला होता. म्हणजेच सुमारे २७ वर्षांच्या कालावधीनंतर याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली. यामध्ये एकच समाधानाची बाब अशी आहे की, सेवेतून कमी केलेला एक कर्मचारी व दुसऱ्या प्रवर्गामध्ये हलविण्यात आलेला एक कर्मचारी असे दोन कर्मचारी सोडता इतर सर्व कर्मचाऱ्यांनी अनुसूचित जमातीची जात वैधता प्रमाणपत्रे सादर केली. जो कर्मचारी आता विशेष मागास प्रवर्गामध्ये हलविण्यात आला तो पूर्वीच जर हलविण्यात आला असता तर अनुसूचित जमाती प्रवर्गाचे एक पद

रिक्त होऊन त्यावर अनुसूचित जमाती प्रवर्गाचा एक उमेदवार निवडला गेला असता, याबाबत आपण कारणमिमांसा केली तर दोन-तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे प्रशासकीय. यामध्ये आपण किती पाठपुरावा करतो ते महत्त्वाचे असते. दुसरे म्हणजे अर्ज केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी देखील १०-१२ वर्षे लागतात. तिसरे म्हणजे कधी काही लोक न्यायालयात जाऊन स्थगिती आणतात. आपण देखील नंतर तारखा वाढवित राहतो. या सर्वच बाबी विलंबास जबाबदार आहेत. त्यामुळे या कारणाबरोबरच विलंबाची इतर देखील कारणे आहेत. अशा प्रकरणांवर कालबद्ध पध्दतीने कशी कार्यवाही करता येईल यावर लक्ष दिले तर योग्य होईल.

यानंतर समितीने यापुढे असे काही व्हायला नको. ही समिती सन २०१७ मध्ये दौऱ्यावर आली म्हणून या गोष्टी उघडकीस आल्या. नाहीतर वर्षानुवर्षे हे चालत राहिले असते. कार्यवाहीमध्ये उशीर होता कामा नये असे समितीचे मत आहे. शासनाचे कामकाज शासन निर्णयांवर चालत असताना याच शासन निर्णयांची पायमल्ली होते, हे योग्य नाही. सन १९९५ नंतरचा बिंदू नामावलीबाबतचा अहवाल समितीस सादर करावा. अनुसूचित जमाती प्रवर्गाचा एक उमेदवार २० वर्षांपूर्वीच सेवेमध्ये रुजू झाला असता परंतु याबाबतच्या कार्यवाहीस विलंब झाला. याबाबत शहानिशा व चौकशी करून विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी असे निर्देशित केले.

समितीने, दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयानुसार आपण कार्यवाही केलेली आहे काय, याबाबत विचारणा केली असता सचिव (सामान्य प्रशासन) यांनी नमूद केले की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने श्री. जगदीश बलराम यांच्या केसमध्ये हा निर्णय दिलेला आहे. त्यानंतर त्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने सन २०१७ मध्ये शासन निर्णय काढला. त्यानुसार त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने व चांगली होण्यासाठी दिनांक ५ जुलै, २०१८ रोजी मंत्रिमंडळाची उप समिती स्थापन केलेली आहे. परंतु आपण काढलेल्या शासन निर्णयाला नागपूर खंडपिठामध्ये आव्हान देण्यात आले. त्यामुळे याबाबत आपण निर्णय घेऊ शकत नाही. त्यांनी अवमान याचिका दाखल केलेली आहे. आपण त्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले असून त्याची एक सुनावणी झालेली आहे व आता पुढील सुनावणी दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी होणार आहे. दिनांक १५ जून, १९९५ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ पर्यंत एकूण ६३,६९३ कर्मचारी, अधिकाऱ्यांपैकी ५१,१७३ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तसेच १२,५२० कर्मचारी, अधिकाऱ्यांनी अजूनपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सदरहू आकडेवारी माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार याबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रिमंडळाची उप समिती स्थापन करून तातडीने कार्यवाही करण्याचे निश्चित केलेले आहे. परंतु त्यावर सध्या जैसे थे परिस्थिती असल्यामुळे आपल्याला कार्यवाही करता येत नाही. आम्ही ही माहिती मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे, आता ही बाब विचाराधीन आहे.

समितीने, यावर सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या निर्णयानुसार आपल्या सामान्य प्रशासन विभागाकडे इतर सर्व विभागांकडून प्राप्त झालेली सर्व माहिती किंवा कर्मचारी, अधिकारी यांच्या नावांसह संपूर्ण यादी सादर करावी. राज्यात वेगवेगळ्या विभागांमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी, अधिकारी यांची एकूण संख्या किती आहे, त्यापैकी किती कर्मचारी, अधिकाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे व किती जणांनी प्रमाणपत्र सादर केलेले नाही, याबाबतची आकडेवारी कर्मचारी, अधिकारी यांच्या नावांसह समितीला दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ पर्यंत सादर करण्यात यावी, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या संदर्भात विभागाने तयारी केलेली असेल. तसेच विभागांमध्ये बिंदुनामावली प्रमाणेच पद भरती केली जात असते. दर ३ वर्षांनी मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावली तपासून घेणे बंधनकारक आहे व ती तपासून आल्यावर त्यानुसार सर्व विभागातील यंत्रणा पद भरती करीत असते. बिंदू नामावलीसंदर्भातील सविस्तर यादी आपल्याकडे असणे आवश्यक आहे व तशी यादी आपल्याकडे आहे काय ? महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील एकूण किती पदे आहे, त्यापैकी किती पदे भरण्यात आलेली आहे व किती पदे रिक्त आहे ? रिक्त पदे केव्हा पासून रिक्त आहेत ? आपल्याला याबाबतची सर्व माहिती माननीय उच्च न्यायालयात सादर करावी लागणार आहे.यासंदर्भातील सर्व शासकीय विभागातील व राज्य शासनाच्या सर्व यंत्रणांची माहिती केव्हा मागविली जाणार आहे ? याबाबतची माहिती समितीला उपलब्ध करून दिल्यास समितीला अनुसूचित जमातीच्या कल्याणाकरिता पुढील काम करणे सोयीस्कर होईल. असे सूचित केले असता समितीच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. असे सचिवांनी आश्वासित केले . मागासवर्गीय आयोगाकरिता माहिती जमा केलेली आहे. याबाबत परवानगी घेण्यात येईल. तसेच अध्यक्ष महोदय माझी आपणांस विनंती आहे की, आपण अनुसूचित जमाती प्रवर्गातील संबंधित माहिती सादर करण्याकरिता दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ ही तारीख दिलेली असून त्याकरिता अजून एक महिना वाढवून देण्यात यावा.

समितीने दिनांक ३० जून, २०१६ मध्ये श्री. डांगले यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या प्रकरणाबाबत माहिती देण्यास सांगितले असता ही पद भरती २०१५ मध्ये झाली होती. सदरहू भरती शासनाच्या परिपत्रकानुसार झाली की, कसे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात येईल व सदरहू अहवाल समितीला सादर करण्यात येईल असे सचिवांनी नमूद केले.

समितीने केंद्र प्रमुख संवर्गात ७ पदांचा अनुशेष, वाहन चालक संवर्गातील ५ पदांचा अनुशेष आणि पशुधन पर्यवेक्षक १, कनिष्ठ अभियंता ४ या पदांचा अनुशेष अद्यापपर्यंत न भरण्याची कारणे काय आहेत ? ग्रामपंचायत विभागात १ ग्रामविकास अधिकाऱ्याने जात प्रमाणपत्र सादर न केल्याने अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला आहे काय अशी विचारणा केली असता सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांनी हा बिंदू रिक्त केलेला आहे असे सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**रिक्त पदांचा अनुशेष :**

समितीने रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्याच्या वेळी दिनांक ७ जून, २०१७ रोजी जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे बैठक घेतली सदर बैठकीच्या वेळी समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील कनिष्ठ सहायक /वरिष्ठ सहायक/ विस्तार अधिकारी व चालक संवर्गातील एकूण ९ पदे, ग्रामसेवक संवर्गातील ८ पदे, बालकल्याण विभागात पर्यवेक्षिका संवर्गात २ पदे, शिक्षण विभागात ८० पदे रिक्त असल्याचे सदर बैठकीत समितीच्या निदर्शनास आले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने याबाबत समिती नाराजी व्यक्त करते. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी पदावरील श्रीमती तोटेवार यांना अनुदानित शाळेतील अनुभव नसल्याने त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले होते. तथापि, त्या न्यायालयात गेल्याने प्रकरण प्रलंबित आहे. **याबाबत समिती अशी शिफारस करते की कागदपत्र न तपासता नियुक्ती देणारे संबंधित अधिकारी यांच्यावर त्वरित कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करण्यात यावा.**

सदर रिक्त पदांबाबत दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली असता जो पर्यंत जिल्हा परिषदा त्यांचा आकृतीबंध पूर्ण करीत नाहीत आणि दुसऱ्यांदा त्यासाठी परवानगी घेत नाहीत तोपर्यंत पदभरती करु नये असा एक वर्षापूर्वी शासनाने आदेश दिला होता. त्यामुळे पदभरती थांबली होती. असे सांगण्यात आले. तथापि, आता पदभरती करण्यास परवानगी मिळाली आहे. **त्यामुळे रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जात पडताळणी :**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, रत्नागिरी जिल्हा परिषदेत जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या दोन कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्याला सेवेतून कमी करण्यात आले तर दुसऱ्याला विशेष मागास प्रवर्गात घेण्यात आले. तथापि, या कार्यवाहीस सुमारे २७ वर्षांचा कालावधी लागला आहे. ज्या कर्मचाऱ्यास सेवेतून कमी केले तो कर्मचारी सन १९८८ मध्ये सेवेत रूजू झाला होता. कार्यवाहीस विलंब झाल्यामुळे बिंदू रिक्त झाले नाहीत व त्यामुळे दरम्यानच्या कालावधीमध्ये झालेल्या भरती प्रक्रियेमध्ये सदर पद भरले गेले नाही व या कारणाने खरोखर अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये असणाऱ्या लोकांवर अन्याय झालेला आहे. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, सन १९९५ नंतरच्या बिंदू नामावलीबाबतचा अहवाल समितीस सादर करावा, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गात एक उमेदवार २७ वर्षापूर्वी सेवेमध्ये रूजू झाला परंतू त्यांच्यावरील कारवाईस इतका विलंब झाला या बाबत शहानिशा व चौकशी करून विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी व याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा.**

## जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ते ९ जून, २०१७ या कालावधीत केलेल्या दौऱ्यात दिनांक ९ जून २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन घेतलेल्या बैठकीत अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती,बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

### अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती बढती, आरक्षण व अनुशेष :

सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या विविध विभागांमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ मधील संवर्गांमध्ये एकूण किती पदे मंजूर आहेत, मंजूर पदांपैकी अनुसचित जमातीची सरळसेवेची व पदोन्नतीची किती पदे राखीव आहेत व त्यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत याबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, अव्वल कारकून या संवर्गातील २, लिपिक टंकलेखक या संवर्गातील २ पदे ही पदोन्नतीची पदे पात्र उमेदवार नसल्यामुळे सन जून, २०१५ पासून रिक्त आहेत. दर तीन वर्षानंतर विभागीय परीक्षा घेण्यात येतात. त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर पदोन्नती देण्यात येते. परंतु, फिडर कॅडरमध्ये उमेदवार नसल्यामुळे ही पदे भरण्यात आलेली नाहीत. सरळसेवेची पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात येते. सदर पदे भरल्यानंतर अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र आणण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देतो. सन २०१२ ते मार्च, २०१७ या कालावधीतील पदोन्नतीची ६ पदे व सरळसेवेची ११ पदे आहेत. जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भात तलाठी संवर्गामध्ये पाच जणांना सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते. यापैकी श्री.धनंजय चंद्रकांत सिंगनाथ, श्री. दिलीप चंद्रकांत ठाकूर, श्री. एकनाथ परशुराम गंगावणे, श्री. उमेश यशवंत सिंगनाथ हे दिनांक १७ मे २०१७ रोजी सुनावणीसाठी उपस्थित होते, तर श्रीमती सरिता बावलेकर या सुनावणीस अनुपस्थित होत्या. श्री. आर. एस. ठाकूर, तलाठी हे दिनांक ६ जुलै २०१२ रोजी शासकीय सेवेत रूजू झाले असून दिनांक २६ जून २०१३ रोजी त्यांचा जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

### जात पडताळणी प्रमाणपत्र :—

समितीने सन १९९५ पूर्वीची व नंतर किती प्रकरणे आहेत असा प्रश्न केला असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, सन १९९५ पूर्वी सेवेत दाखल झालेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ९ असून ७ जणांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे, २ जणांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.सन १९९५ नंतर ३४ अनुसूचित जमातीचे कर्मचारी सेवेत दाखल झाले असून त्यापैकी १८ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे, तर १६ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सन १९९५ पूर्वीचे जे कर्मचारी आहेत त्यांना संरक्षण आहे. सन २००१ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे सादर केले आहेत. शिपाई संवर्गातील श्रीमती एन. एस. मोरे यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. एकूण १६ प्रकरणांपैकी १४ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे आहेत. त्यानंतर प्रकल्प

अधिकाऱ्यांनी पुढे असे विदित केले की, ५ जिल्हे वगळता सर्व ठाकर समाज हा भटक्या जमाती मध्ये होता आणि ५ जिल्ह्यातील ठाकर समाज हा अनुसूचीत जमातीमध्ये होता. उर्वरित महाराष्ट्रातील ठाकर समाज हा इतर मागासवर्गामध्ये होता. त्यानंतर केंद्र सरकारने संपूर्ण महाराष्ट्रातील एरिया पाहणी केला व त्यामुळे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाज हा अनुसूचित जमाती मध्ये आला आहे. सन २००४ पर्यंत २०० प्रकरणात या संदर्भातील निर्णय समितीने घेतलेला आहे. परंतु, काही लोक उच्च न्यायालयात गेले व उच्च न्यायालयाने ही प्रकरणे पुन्हा तपासावीत, असे आदेश दिले होते. काही प्रकरणात तर तीन ते चार वेळा निर्णय दिलेला आहे. परंतु, कर्मचारी उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात जातात. प्रलंबित प्रकरणांपैकी ६ प्रकरणांत संबंधितांना सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील एकूण १४ प्रकरणे प्रलंबित आहेत. ६ प्रकरणात सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यापैकी ५ प्रकरणात संबंधित व्यक्ती सुनावणीसाठी उपस्थित होते. एका प्रकरणातील व्यक्ती उपस्थित राहिली नाही.

**अनुसूचित जमाती प्रवर्गातील राबवावयाच्या योजना :—**

समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गाची लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. अनेक लोकांना रोजगार नाही आणि शिक्षणाचा देखील अभाव आहे. या समाजाचा जीवनस्थर उंचावण्यासाठी आपण काही उपाययोजना केल्या आहेत का अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी खालील माहिती दिली.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांचा जीवनस्थर उंचावण्यासाठी ज्यांना घर नाही त्यांना आतापर्यंत १६ घरकुले बांधून दिली आहेत. तसेच, ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांना शासकीय जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. साधारणपणे १५ ते २५ कुटुंबांना एका गावामध्ये स्थिर करावयाचे आहे. परंतु, त्या गावातील ग्राम पंचायत किंवा ग्रामसभा यास मंजुरी देण्यास तयार नाही. देवगड तालुक्यातील सौंदड येथे २६ पट्टे वाटण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर प्रस्तावास ग्राम पंचायत मान्यता देण्यास तयार नाही.त्यांनी या संदर्भातील ठराव केलेला नाही. त्यामुळे पट्टे देत असताना अडचण निर्माण झाली आहे. देवगड तालुक्यात गौंड गाव असून तेथे कातकरी समाजाचे लोक खाजगी जमिनीमध्ये अतिक्रमण करून रहात होते. त्यांना कायम स्वरुपी निवारा उपलब्ध व्हावा, यासाठी खूप प्रयत्न केले. संबंधित खाजगी व्यक्ती जागा नावावर करून देण्यास तयार नव्हत्या अन्य ठिकाणी शासकीय जमीन उपलब्ध होती. परंतु, सदर जागेसाठी जोड रस्ता नव्हता. त्यानंतर आम्ही कातकरी समाजाच्या लोकांना एकत्र केले, गावकऱ्यांशी चर्चा करून २६ घरकुले अन्य ठिकाणी बांधून दिली. आता या समाजाच्या लोकांना आपण जातीचे दाखले दिले आहेत, रेशन कार्ड तयार करून दिले आहे.त्यांच्याकडून प्रस्ताव तयार करून घेतला आहे. खाजगी जमिनीबाबत जमीन मालकाकडून प्रतिज्ञापत्र तयार करून घेतले आहे व आता यासंबंधीचा अंतिम प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

यावर ग्राम पंचायतीने जरी नकारात्मक ठराव केला असला तरी त्यांनी केलेला ठराव सामाजिक दृष्टीकोनातून कधीही समर्थनीय ठरू शकत नाही. आपण आदिवासींना मूळ प्रवाहात आणण्याचा आणि त्यांचा जीवनस्थर उंचावण्याचा प्रयत्न करीत आहात. अशा कामामध्ये जर ग्राम पंचायत किंवा ग्रामसभा अडथळा आणणार

असेल तर जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा ग्राम पंचायतीचा ठराव रद्दबातल ठरवू शकते. आदिवासींना आपण शासकीय जमीन देत आहोत. त्यामुळे शासकीय जमिनीच्या बाबतीत ग्राम पंचायतीने नकार देण्याचा काही प्रश्न नाही. तशीच आवश्यकता असेल तर आपण ही बाब शासनाला कळवावी. आदिवासी विकास विभागाची स्वाभिमान योजना आहे. यामध्ये आपण २ एकर बागायती आणि ४ एकर जिरायती जमीन देऊ शकतो. ही योजना देखील आपण राबवावी. हा आदिम समाज असल्यामुळे त्यांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न करावा असे समितीने निर्देशित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयासंदर्भात दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी घेतलेल्या विभागाच्या समितीने आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र तपासणीची किती प्रकरणे आहेत आणि कोणकोणत्या जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, याबाबत सन १९९५ नंतर आपल्या कार्यालयात अनुसूचित जमाती प्रवर्गातील १६ कर्मचारी आले आहेत. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र आपल्याकडे सादर केलेले नाही. त्यामुळे आपण त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, कार्यालयात एकूण ४५ कर्मचारी असून त्यापैकी २८ कर्मचाऱ्यांना वैधता प्रमाणपत्र मिळालेले आहे. १७ प्रकरणे जी प्रलंबित आहेत ती ठाणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत आणि मुख्यत्वेकरून ही प्रकरणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाशी संबंधित आणि गुंतागुंतीच्या ज्या केसेस आहेत त्या ठाणे जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे प्रलंबित आहेत, त्या सर्वांना नोटीस दिल्या आहेत. त्यांना सेवेतून कमी न करण्याचे कारण असे आहे की ज्या समितीकडे ती प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांनी त्यांना अद्याप अवैध असल्याचे आम्हाला कळविलेले नाही. म्हणजे त्या त्या समित्यांकडून त्यांच्या जात वैधतेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

समितीने तलाठी संवर्गातील श्री. धनंजय सिंगनाथ, दिलीप ठाकूर, एकनाथ गंगावणे, श्री. उमेश सिंगनाथ व श्रीमती सरिता बावलेकर व श्री. आर. एस. ठाकूर यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत विचारणा केली असता सह आयुक्त, जातपडताळणी समिती विदित केले की, सध्या आमच्याकडे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची विशेष मोहीम सुरू असल्याने विलंब होत आहे ही प्रकरणे जूनी असून समन्वय साधून कार्यवाही करण्यात येईल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ठाकर समाज आहे. सन २००४ मध्ये आपण सुमारे २०० प्रकरणे निकाली काढली आहेत. त्यानंतर ते लोक माननीय उच्च न्यायालयात गेले होते. उच्च न्यायालयाने त्यांच्या प्रकरणी वैयक्तिक निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार त्यांच्या वैयक्तिक प्रकरणी निर्णय घेतले असून त्या प्रकरणावर कार्यवाही सुरू आहे.

**अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेबाबत :—**

समितीने, अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी बांधण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी सौंदड (ता. देवगड) या गावात जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे काय, त्या गावातील लोकांना त्याच गावात घरकुल बांधून देण्यात आले आहे की दुसरीकडे घरकुले बांधून दिली आहेत अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार आम्ही कोकण विभागामध्ये कातकरी उत्थान अभियान राबविले होते. आता कुळ कायद्यामध्ये एक अतिशय चांगली सुधारणा करण्यात आली आहे. कातकरी व्यक्तीने जर शासकीय जमिनीवर घर बांधले असेल तरी कुळ कायद्याने तो मालक बनतो. या दृष्टीने आपण ही मोहीम हाती घेतली असल्यामुळे संबंधित व्यक्ती आता त्या जागेचा मालकच होतो. त्यामुळे आपल्याला अशा प्रकरणी वेगळे काही करायची गरजच नाही. सौंदड गावातील लोकांना शासकीय जमिनीवर घरे बांधून देण्यात आली आहेत आणि ती त्याच गावामध्ये आहेत. शबरी योजनेंतर्गत ते गाव येते.

यानंतर समितीने मालवण नगरपालिकेची बिंदू नामावली नोंदवही दर ३ वर्षांनी तपासण्यात येत नसल्याचे समितीला दौऱ्याच्या वेळी आढळून आले होते. त्यावेळेस समितीने याबाबत संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करून समितीस अहवाल सादर करण्याबाबत निदेश दिले होते. परंतु त्यासंबंधी समितीस अद्यापपर्यंत काहीही अवगत करण्यात आले नाही. या प्रकरणी शहानिशा करून कोण दोषी आहेत त्याची माहिती सादर करावी असे सांगितले असता सदर माहिती लवकरात लवकर सादर करतो असे जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे :**

समितीने दिनांक ९ जून, २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देवून बैठक घेतली होती. सदर बैठकीत सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील अव्वल कारकून या संवर्गातील २ व लिपीक टंकलेखक या संवर्गातील २ पदे माहे जून, २०१५ पासून रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनेक वर्षांपासून ही पदे रिक्त असल्याने कार्यालयात काम करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असतो त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरते. **सबब अव्वल कारकून २ पदे व लिपिक-टंकलेखक २ पदे अशी एकूण ४ रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यावाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत देण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(२) जातपडताळणी प्रमाणपत्र :**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीस, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात एकूण ४५ कर्मचारी असून त्यापैकी २८ कर्मचाऱ्यांना जातवैधता प्रमाणपत्र मिळाले आहे व १७ प्रकरणे ठाणे जातपडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याची आणि मुख्यत्वे ही प्रकरणे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाशी संबंधित आहेत अशी माहिती देण्यात आली. जातपडताळणी समितीकडून त्यांच्या जातवैधतेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. यापैकी काही कर्मचारी मा. उच्च न्यायालयात गेले होते. उच्च न्यायालयाने त्यांच्या प्रकरणी वैयक्तिक निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या असल्याने त्यानुसार त्यांच्या वैयक्तिक प्रकरणी निर्णय घेतले असून त्या प्रकरणांवर कार्यवाही सुरू असल्याचे तसेच तलाठी संवर्गातील श्री. धनंजय सिंगनाथ, श्री. दिलिप ठाकूर, श्री. एकनाथ गंगावणे, श्री. उमेश सिंगनाथ व श्रीमती सरिता बावलेकर यांनी जात वैधता प्रमाणपत्र अजूनही सादर केलेले नाही असेही समितीस आढळून आले. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, सन १९९५ नंतर भरती झालेल्या कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र घेण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करून योग्य ती कारवाई करावी तसेच दिनांक १८ मे, २०१३ चा शासन निर्णय व मा. उच्च न्यायालयाचा निर्णय यांच्या अधीन राहून जातपडताळणी प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत द्यावी.**

**(३) अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणारी घरकुल योजना :—**

समितीच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्याच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांचा जीवन स्तर उंचावण्यासाठी ज्यांना घर नाही त्यांना घरकुले बांधून दिली जातात. तसेच ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांना शासकीय जमिनीचे वाटप करण्यात येते. आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणारी भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक भूमिहीन कुटुंबास ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर ओलिताखालील जमीन उपलब्ध करून देण्यात येते. **या योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने त्वरेने कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जात पडताळणीबाबत :–**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ते ९ जून, २०१७ या कालावधीत केलेल्या दौऱ्यात दिनांक ९ जून २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा परिषद कार्यालयास भेट देऊन घेतलेल्या बैठकीत अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती,बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

समितीने, अनुसूचित जमाती प्रवर्गातील विस्तार अधिकारी व ग्राम विस्तार अधिकारी या संवर्गातील ४ पदांचा अनुशेष केव्हापासून आहे, सदर अनुशेषाची पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच ज्यांना पदोन्नती दिली आहे त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेतले आहे काय अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१६ व सन २०१७ या वर्षामध्ये शासन स्तरावरून भरती कार्यक्रम घोषित झाला नसल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत. पुढील भरतीमध्ये ही पदे भरली जातील. यामध्ये पदोन्नतीमध्ये १ पद रिक्त आहे. श्री. प्रमोद ठाकर व श्री. इंगळे यांचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे पाठविले आहे. चार कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे पदोन्नती दिलेली नाही. यामध्ये ठाकर समाजाचे ५ कर्मचारी आहेत. औरंगाबाद जात पडताळणी समितीकडे प्रकरणे पाठविण्यात आली आहेत. यावर समितीने जात वैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर प्राप्त करून घेण्याचे निर्देश दिले.

समितीने, या जिल्ह्यात अंगणवाडी सेविका संवर्गात किती कर्मचारी कार्यरत आहेत व त्यापैकी अनुसूचित जमातीचे किती कर्मचारी आहेत असा प्रश्न उपस्थित केला असता जिल्ह्यात १२३९ अंगणवाडी सेविका आहेत. परंतु, अनुसूचित जमातीच्या किती आहेत, याबाबतची आकडेवारी उपलब्ध नाही. असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले.

यावर समितीने, अंगणवाडी सेविकांना आपण वरील पदावर पदोन्नती देत असतो. यासाठी आरक्षण लागू आहे. परंतु, जर तुमच्याकडे फिडर कॅडरमध्ये किती अनुसूचित जमातीचे कर्मचारी कार्यरत आहेत, याचीच माहिती नसेल तर तुम्ही पदोन्नती कशी देणार असा प्रश्न उपस्थित केला.

समितीने सामान्य प्रशासन विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातून संवर्गनिहाय एकूण ३३ पदे भरण्यात आली आहेत. पदे भरण्यापूर्वी कर्मचाऱ्याकडून वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय असे विचारले असता यामध्ये ७ उमेदवारांकडे वैधता प्रमाणपत्र नाहीत जात पडताळणी समितीकडे प्रकरणे सादर केली आहेत. असे जिल्हापरिषदेकडून सांगण्यात आले.

**आरोग्य विभाग :**

समितीने, अनुसूचित जमाती प्रवर्गातील वर्ग-३ मध्ये भरलेल्या एकूण ३० पदांवरील कर्मचांऱ्याकडून जातवैधता प्रमाणपत्र घेतली आहेत काय अशी विचारणा केली असता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी १८ कर्मचाऱ्यांची जातवैधता प्रमाणपत्र अप्राप्त आहेत. यापैकी ठाणे-९, नागपूर-१, अमरावती-७ आणि औरंगाबाद-१ या जातवैधता पडताळणी समितीकडे प्रकरणे प्रलंबित आहेत असे सांगितले.

यावर समितीने, सदर कर्मचाऱ्यांना जातवैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळवून घेण्याबाबत पाठपुरावा करण्यास सांगावे असे सूचित केले.

**पशुसंवर्धन विभाग :**

समितीने, पशुसंवर्धन विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातील भरण्यात आलेल्या ५ कर्मचाऱ्यांकडून जातवैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय, अशी विचारणा केली असता जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी विदित केले की, उक्त पाच पैकी एका कर्मचाऱ्यांकडून जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही.

**महिला व बालकल्याण विभाग :**

समितीने, मुख्यसेविका संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नतीने भरावयाच्या २ पदांचा अनुशेष केव्हा पासून आहे. सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे. अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सरळसेवेची दोन्ही पदे भरण्यात आली आहे. पदोन्नतीने भरावयाच्या २ पदांपैकी अंगणवाडी सेविकामधून १ पात्र उमेदवार उपलब्ध झाला होता. तथापि त्यांच्याकडे जातवैधता प्रमाणपत्र नसल्याने त्याना पदोन्नती देण्यात आली नाही. उवरित १ पद पात्र कर्मचारी नसल्यामुळे रिक्त आहे.

**जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षकांच्या भरतीबाबत :—**

समितीने, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिक्षण विभागांतर्गत संवर्गनिहाय एकूण ८५ पदांचा अनुशेष विविध कारणाने केव्हापासून रिक्त आहे. सदर अनुशेषाची पदे भरणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी विदित केले की, एकूण ८५ पदांचा अनुशेष आहे. केंद्र प्रमुख व केंद्र प्रमुख (स्पर्धा) ही पदे शालेय शिक्षण विभागाकडून भरण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद, सिंधुदुर्गकरिता २० मुख्याध्यापकांची पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ४२० मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे २० मुख्याध्यापक वगळता उर्वरित मुख्याध्यापक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे उपशिक्षक संवर्गात समायोजन होणार आहे. समायोजन होणाऱ्या मुख्याध्यापकात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ३२ कर्मचारी आहेत. त्यामुळे अनुशेषातील ७८ पैकी ३२ पदे समायोजनातून भरली जाणार आहेत. उर्वरित ४६ पदे शिक्षण संचालक यांच्यामार्फत भरली जाणार आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पुढे असे अवगत केले की, सन २००९-२०१० पासून शासनस्तरावर शिक्षक भरती झालेली नाही. दरवर्षी काही शिक्षक निवृत्त होत असतात. आरटीईनुसार १०० मुलांमागे एक मुख्याध्यापक असा निकष आहे. आरटीईनुसार जिल्हा परिषद, सिंधुदुर्गकरिता २० मुख्याध्यापकाची पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ४२० मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामधील २० मुख्याध्यापक वगळता उर्वरित मुख्याध्यापक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे उपशिक्षक संवर्गात समायोजन होणार आहे. सदरील समायोजन होणाऱ्या मुख्याध्यापकामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील ३२ कर्मचारी आहेत. त्यामुळे उपशिक्षक संवर्गात अनुसूचित जमाती अनुशेषांतर्गत ७८ पदापैकी ३२ पदे समायोजनाने भरली जाणार आहेत.

मुख्याध्यापकांची श्रेणी तीच राहणार आहे. मुख्याध्यापकांचा ग्रेड तोच ठेवावा असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मुख्याध्यापकांचे पदनाम बदलणार आहे. त्यांनी उपशिक्षक म्हणून काम करावयाचे आहे.

जातवैधता पडताळणी समितीकडे जिल्हापरिषदेची एकूण ६२ प्रकरणे असून त्यापैकी ३ प्रकरणे अवैध, ३१ वैध आणि २८ प्रकरणी निर्णय न झाल्यामुळे प्रलंबित आहेत.

**अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना :—**

समितीने केंद्र व राज्य शासनाच्या योजनांबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हापरिषदेकडून माहिती मिळाली की, जननी सुरक्षा, सावित्रीबाई कन्या योजना यासह विविध योजना राबविलेल्या आहेत. तसेच, शालेय विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वाटप करण्यात आलेले आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी ३६८४७ संच वाटण्यात आले आहेत, तर इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २९११५ संच देण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये ४१२ अनुसूचित जमातीच्या मुलांना व ३७६ मुलींना व सन २०१६-२०१७ मध्ये ३८७ मुलांना व ३६० मुलींना लाभ देण्यात आलेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये अनुसूचित जमातीच्या २५४ मुलांना व २२१ मुलींना अशा एकूण ४७५ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे. सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये २२३ मुलांना व १९९ मुलींना अशा एकूण ४२२ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ मध्ये उपस्थिती भत्त्यासाठी मंजूर नियतव्यय रुपये १,५०,०००.०० इतका होता व तेवढीच तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली होती. यापैकी रुपये १,१७,७००.०० इतकी रक्कम बीडीएसद्वारे काढण्यात आलेली आहे. यात एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ५३५ असून अनुसूचित जमातीच्या लाभार्थीची संख्या २६ इतकी आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सन २०१६ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याला पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले आहे.

समितीने विद्यार्थ्यांच्या उपस्थिती भत्याची विचारणा केली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी नमूद केले की, नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन १ रुपये या दराने २२० दिवस प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची योजना आहे म्हणजे वर्षाला २२० रुपये देण्यात येतात.

समितीने यावर, विद्यार्थ्यांना देण्यात येणारा सदर उपस्थिती भत्ता हा फारच कमी आहे. तो वाढविण्याची आवश्यकता आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

**जात पडताळणी प्रमाणपत्र :—**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ९ जून २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्हापरिषदेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ८ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने, श्री. प्रमोद ठाकर व श्री. इंगळे यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत कोणता निर्णय झाला आहे, याबाबत समितीस माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ठाणे जातपडताळणी समितीकडे सदर प्रकरण असून जात वैधतेची जी चार प्रकरणे होती, त्यापैकी ३ प्रकरणे अमरावती जात पडताळणी समितीकडे आणि १ प्रकरण ठाणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबीत होते. श्री. इंगळे यांचे ग्रामसेवक मधून ग्रामविकास अधिकारी म्हणून सन २००३ मध्ये त्यांची पदोन्नती झाली आहे. सिंधुदुर्ग

जिल्ह्याची जेवढी प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत त्या जास्तीत जास्त ठाकर समाजाची आहेत. ठाणे जिल्ह्याकडे १ आणि अमरावती जिल्ह्याकडे ३ प्रकरणे प्रलंबित होती त्यातून ठाणे जिल्ह्यातून १ प्रकरण निकाली काढले आहे आणि बाकी ३ प्रकरणे अजून प्रलंबित आहेत. याबद्दल जात वैधता समिती, अमरावती यांना स्मरणपत्र पण काढले होते.

समितीने, मुख्यसेविका संवर्गात १ पद भरताना त्यांचेकडून जात वैधता प्रमाणपत्र न घेण्याची कारणे काय आहेत ? जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या अंगणवाडी सेविका आहेत तसेच त्यांना पदोन्नती देताना कोणते निकष लावण्यात येतात, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले की, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग अंतर्गत अंगणवाडी सेविका १,२२१ आणि मिनी अंगणवाडी सेविका ३३४ अशा एकूण १,५५५ सेविका कार्यरत आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील एकूण ७ सेविका कार्यरत आहेत. सन २०१५-१६ मध्ये अंगणवाडी सेविकांमधून मुख्यसेविका पदासाठी पात्र उमेदवारांची परीक्षा घेण्यात आली होती. परंतु त्यामध्ये केवळ एकच उमेदवार उत्तीर्ण झाली. ती महिला ठाकर समाजाची होती. परंतु त्या महिलेचे जात वैधता प्रमाणपत्र प्रशासनास प्राप्त झालेले नाही. सदरहू उमेदवाराच्या जात पडताळणीबाबतचा प्रस्ताव दि. ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी ठाणे येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर केलेला आहे. या प्रकरणी उक्त समितीला दि.१० मार्च २०१६, दि. ८ जुलै २०१६, दि.१० एप्रिल २०१७ आणि दि.२४ जानेवारी, २०१८ रोजी स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली आहेत.

समितीने, केलेल्या दौऱ्याच्या वेळी शिक्षण विभागात भरण्यात आलेल्या २०९ नियुक्त कर्मचाऱ्यांपैकी ४९ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नव्हते. सद्य:स्थितीत या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे काय तसेच आरोग्य विभागातील १८ कर्मचाऱ्यांच्या जातपडताळणी बाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुख्याध्यापक संवर्गाची ३ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. उपशिक्षक संवर्गाची ५२ प्रकरणे प्रलंबित आहेत. मुख्याध्यापक संवर्गाची प्रकरणे ठाणे जात पडताळणी समितीकडे आणि उपशिक्षक संवर्गाची प्रकरणे ठाणे, औरंगाबाद, अकोला, पुणे व अमरावती पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. ठाणे येथील पडताळणी समितीकडे ९, नागपूर समितीकडे १, अमरावती समितीकडे ६ आणि औरंगाबाद येथील पडताळणी समितीकडे २ अशा प्रकारे एकूण १८ प्रकरणे विविध समित्यांकडे प्रलंबित आहेत.

समितीने यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे आजच्या साक्षीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती उपलब्ध नाही. त्यांनी जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व मुद्द्यांची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात समितीला उपलब्ध करून द्यावी. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण विभागांतर्गत येणाऱ्या विविध संवर्गातील प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. हे कर्मचारी सेवेत कधी नियुक्त झाले, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी समितीकडे कधी अर्ज सादर केले आणि ज्यांनी विहित मुदतीत जात वैधता

प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांच्यावर काय कारवाई केली या बाबतची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात समितीकडे सादर करावी. तसेच जात पडताळणी समितीचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) अनुसुचित जमातीच्या उमेदवारांची रिक्त पदे :**

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस दिनांक ९ जून २०१७ रोजी भेट दिली होती. सदर भेटीच्या वेळी अनुसूचित जमाती प्रवर्गातील विस्तार अधिकारी व ग्राम विस्तार अधिकारी या संवर्गातील ४ पदांचा अनुशेष तसेच शिक्षण विभागात एकूण ८५ पदांचा अनुशेष आहे यातील केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुख (स्पर्धा) ही पदे शालेय शिक्षण विभागाकडून भरण्यात येणार आहेत जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग करिता २० मुख्याध्यापकांची पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ४२० मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे २० मुख्याध्यापक वगळता उर्वरित मुख्याध्यापक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे उपशिक्षक संवर्गात समायोजन होणार आहे. समायोजन होणाऱ्या मुख्याध्यापकात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ३२ कर्मचारी आहेत. त्यामुळे अनुशेषातील ७८ पैकी ३२ पदे समायोजनातून भरली जाणार आहेत उर्वरित ४६ पदे शिक्षण संचालक यांच्या मार्फत भरली जाणार आहेत असे समितीच्या निदर्शनास आले.

सबब, **विस्तार अधिकारी संवर्गातील ४ पदांचा व शिक्षण विभागातील ८५ पदांचा अनुशेष भरण्याचे व ३२ कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) जात पडताळणी प्रमाणपत्र :**

समितीस विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी शिक्षण विभागातील मुख्याध्यापक संवर्गाची ३ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, उपशिक्षक संवर्गाची ५२ प्रकरणे प्रलंबीत आहेत. मुख्याध्यापक संवर्गाची प्रकरणे ठाणे जातपडताळणी समितीकडे आणि उप शिक्षक संवर्गाची प्रकरणे ठाणे, औरंगाबाद, अकोला, पुणे व अमरावती जातपडताळणी समितीकडे प्रलंबीत आहेत. आरोग्य विभागातील ठाणे जातपडताळणी समितीकडे ९, नागपूर समितीकडे १, अमरावती समितीकडे ६ आणि औरंगाबाद येथील जात पडताळणी समितीकडे २ अशी एकूण १८ प्रकरणे विविध जातपडताळणी समित्यांकडे प्रलंबित असल्याचे सांगितले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, माहिला व बालकल्याण विभागांतर्गत येणाऱ्या विविध संवर्गातील प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत ही खेदाची बाब आहे. **प्रलंबित प्रकरणातील कर्मचारी सेवेत कधी नियुक्त झाले, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्रांसाठी समितीकडे कधी अर्ज केले आणि ज्यांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांच्यावर काय कारवाई केली याबाबतची सविस्तर माहिती समितीला त्वरित देण्यात यावी तसेच जातपडताळणी समितीकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात देण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(३) अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना :—**

समितीच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्याच्या वेळी जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील बैठकीत समितीने केंद्र व राज्य शासनाच्या योजनांबाबत माहिती देण्यास सांगितले असता, जिल्हापरिषदेकडून सांगण्यात आले की, जननी सुरक्षा, सावित्रीबाई कन्या योजना यासह विविध योजना राबविलेल्या आहेत. तसेच शालेय विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वाटप करण्यात आलेले आहे. सर्व शिक्षा अभियानांर्तगत विद्यार्थ्यांना संच देण्यात आले आहेत तसेच नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन १ रुपया दराने २२० दिवस प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची योजना आहे म्हणजे वर्षाला २२० रुपये देण्यात येतात. **विद्यार्थ्यांना देण्यात येणारा सदर भत्ता हा फारच कमी आहे. तो वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, सदर उपस्थिती भत्ता हा अत्यल्प असल्यामुळे तो दहा रुपये प्रतिदिन करण्यात यावा तसेच जननी सुरक्षा व सावित्रीबाई फुले कन्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

**(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)**

**पहिली बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ७ जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(३) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(४) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

**जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी**

(१) श्री. प्रदीप पी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी
(२) श्री. बाबासाहेब बेलदार, अपर जिल्हाधिकारी
(३) श्री. सारंग कोडोलकर, निवासी उप जिल्हाधिकारी
(४) श्री. चंद्रकांत डांगे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
(५) श्री. सी. ता. भालेकर, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे
(६) श्री. भाऊसाहेब फटगडे, सहायक आयुक्त (मावक) कोकण भवन
(७) श्री. गजेंद्र केंद्रे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, पेण.

**जिल्हा परिषद, रत्नागिरी**

(१) श्री. लक्ष्मी नारायण मिश्रा, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. विश्वास सिदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी
(४) डॉ. शिवप्रसाद खोत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

**दुसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ९ जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(३) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(४) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(६) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. उदय चौधरी, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

(२) श्री. शेखरसिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

(३) श्री. अनिल बागल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री. सोमनाथ रसाळ, उप मुख्य कार्यकरी अधिकारी

(५) श्री. सी. ता. भालेकर, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे

(६) श्री. भाऊसाहेब फटांगरे, सह आयुक्त मागासवर्ग कक्ष

(७) श्री. गजेंद्र शं. केंद्रे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्याची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

**तिसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

(२) श्री. अरविंद सिंह, प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा)

(३) श्री. शिवाजी दौंड, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष)

(४) श्री. असीमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. संजय मीना, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग

(६) डॉ. दिलीप पांढरपट्टे, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

(७) श्री. प्रदिप पी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी

(८) श्रीमती आंचल गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

(९) श्रीमती मंजूलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

(१०) श्री. तुषार मठकर, सहा. आयुक्त (मावक)

(११) श्री. सि. ता. भालेकर, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे.

उक्त बैठकीत समितीने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली.

**चौथी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २६ फैब्रुवारी, २०१९ रोजी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :–**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(२) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(३) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(४) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(५) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(६) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (स.)

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई